I

पुणे महानगरपालिकेच्या कामा करिता

नगरसचिव कार्यालय,
पुणे महानगरपालिका
दिनांक : १०/७/२०२६

पुणे महानगरपालिका
✷ सूचना ✷
(महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे परिशिष्ठ भाग २ मधील
नियम क्रं.१(डी) (एच) व (आय) अन्वये)
कार्यपत्रिका क्रमांक – ४
(खास सभा)

मा.विशाल धनवडे, मा.जयश्री भूमकर, मा.संदीप बेलदरे, मा.निशा मानवतकर, मा.रूपाली धाडवे व मा. मयुरी कोकाटे या स्थायी समितीच्या ६ (सहा) मा. सभासदांकडून दिनांक ३०/६/२०२६ रोजी लेखी मागणी (रिक्वीझिशन) आल्यावरुन पुणे महानगरपालिकेची विशेष (खास) सभा सोमवार दिनांक २०/७/२०२६ रोजी दुपारी ०२ : ५५ (दोन वाजून पंचावन्न मिनिटे) वाजता हिंदवी स्वराज्याचे संस्थापक श्री छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात (पुणे महानगरपालिकेच्या नविन विस्तारीत इमारतीतील सभागृहात) भरेल.

सदर सभेत खालील विषयाचा विचार होईल.

विषय क्र. ८३

संदर्भ :- १) शासन निर्णय क्र.एनयुआर/२०१३/प्र.क्र.३३८/निवि ३३,दि.१८/२/२०१४
२) PMPML जा.क्र. PMPML /मुलेविअ/३६६९,दि.४/११/२०२५
३)) PMPML जा.क्र. PMPML /मुलेविअ दि.२७/१२/२०२५
४) मा.महापालिका आयुक्त ठराव क्र.६/७३५,दि.६/१/२०२६
५) मा.महापालिका आयुक्त ठराव क्र.६/८९७,दि.१०/३/२०२६
६) PMPML जा.क्र. PMPML /४५,दि.२/४/२०२६
७) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/मुले/४२,दि.२३/४/२०२६ चे पत्र.
८) मा.स्थायी समिती ठराव क्र.१०१,दि.२३/४/२०२६

मा.महा.आयुक्त यांनी केलेली शिफारस विचारात घेऊन व स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून

–

पुणे महानगर परिवहन महामंडळाकडून सन २०२५-२६ या वर्षातील संचलन तुटीपोटी मागणी करण्यात आलेली पुणे महानगरपालिकेच्या हिश्श्याची (६०%) रक्कम सन २०२६-२७ या आर्थिक वर्षात समान मासिक हप्त्यात प्रतिमाह अग्रीम स्वरूपात PMPML संस्थेस आदा करणेसाठी खालील बाबींस मान्यता द्यावी,अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

१) PMPML संस्थेस मा.महापालिका आयुक्त यांच्या विषयपत्रातील संदर्भ क्र.४ चे ठरावान्वये सन २०२५-२६ या वर्षातील संचलन तुटीपोटी सन २०२६-२७ या आर्थिक वर्षात आदा करण्यात येणाऱ्या रक्कमेपैकी सन २०२५-२६ या आर्थिक वर्षामध्ये महामंडळाचे मागणीनुसार निवडणूक कार्यक्रमाच्या दृष्टीने संचलन सुरळीत ठेवणेकामी MNGL कंपनीकडील प्रलंबित देयके आदा करणेसाठी अपवादात्मक बाब म्हणून र.रू.१० कोटी (अक्षरी र.रू.दहा कोटी) PMPML संस्थेस उचल स्वरूपात आदा करणेस पश्चात मान्यता मिळणेस.

२) PMPML संस्थेकडे कर आकारणी कर संकलन विभागाची स्वारगेट व मार्केटयार्ड येथील मिळकत कर थकबाकी पोटी असणारी र.रू.९४,९९,७००/- संचलन तुटीमधून समायोजित करणेस.

३) PMPML संस्थेच्या मागणीनुसार (संदर्भ क्र.२) सन २०२५-२६ या वर्षातील अंदाजित संचलन तूट रक्कम रू.८०८.२६ कोटी इतकी ग्राह्य धरली असता ,पुणे महानगरपालिकेच्या (६०%) स्वामित्व हिश्श्यानुसार र.रू.४८४.९६ कोटी होत असून, त्यापैकी सन २०२५-२६ या आर्थिक वर्षामध्ये मा.महापालिका आयुक्त यांच्या विषयपत्रातील संदर्भ क्र.४ चे ठरावान्वये अपवादात्मक बाब म्हणून PMPML संस्थेस उचल स्वरूपात आदा करण्यात आलेले रक्कम रू.दहा कोटी तसेच महापालिका आयुक्त यांच्या विषयपत्रातील संदर्भ क्र.५ चे ठरावान्वये कर आकारणी कर संकलन विभागाची मिळकत कर थकबाकी पोटी असणारी र.रू.९४,९९,७००/- समायोजित करून समायोजनानंतर उर्वरित संचलन तुटीपोटी देय र.रू.४७४.०१ कोटी (अक्षरी र.रू.चारशे चौऱ्याहत्तर कोटी एक लक्ष) पुणे महानगरपालिकेच्या सन २०२६-२७ चे अंदाजपत्रकात (RE58A101A) ४८ अ, पीएमपीएमएलच्या संचलनामधील तुटीपोटीचा हिस्सा या अर्थशिर्षकांतर्गत करण्यात आलेल्या तरतुदीमधून माहे एप्रिल २०२६ पासून प्रतिमहा रक्कम रू.३९.५० कोटी (अक्षरी र.रू.एकोणचाळीस कोटी पन्नास लक्ष) याप्रमाणे १२ समान मासिक हप्त्यात (माहे एप्रिल २०२६ ते मार्च २०२७) पुणे महानगरपालिकेकडून PMPML संस्थेस आदा करणेस.

४) सदर १२ हप्त्यांपैकी ११ हप्ते आदा केल्यानंतर उर्वरित १२ वा हप्ता पुणे महानगरपालिकेच्या मा.मुख्य लेखापरीक्षक यांचेकडून पीएमपीएमएलच्या सन २०२५-२६ चे ताळेबंदाचे लेखापरिक्षण झालेनंतर,ताळेबंदाचे लेखापरिक्षणानुसार निश्चित झालेली कमी/अधिक रक्कमेनुसार पीएमपीएमएल संस्थेस आदा करणेस.

नगरसचिव कार्यालय,
पुणे महानगरपालिका
शिवाजीनगर पुणे ४११००५
दिनांक :- १०/७/२०२६

मा.महापौर यांचे आज्ञेवरुन

योगिता भोसले ,
नगरसचिव,
पुणे महानगरपालिका

(टिप :-प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयाची कागदपत्रे (डॉकेटस) मा.नगरसचिव यांच्या कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत.)